# संघवी मूव्हर्स लिमिटेड

SANGHVI

नोंदणीकृत कार्यालय : सर्व्हे क्र.९२, ताथवडे,
तालुका मुळशी, पुणे ४११०३३ महाराष्ट्र
फोन +९१ २० ६६७४ ४७०० फॅक्स +९१ २० ६६७४ ४७२४
इ मेल : sanghvi@sanghvicranes.com **www.sanghvicranes.com**
सीआयएन : L29150PN1989PLC054143

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना तसेच दूरस्थ ई–मतदानाची व नोंदणी पुस्तक बंदची माहिती

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीची २६वी वार्षिक सर्वसाधारण सभा कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालय सर्व्हे नं. ९२, ताथवडे, तालुका मुळशी, पुणे ४११०३३, बुधवार दिनांक २३ सप्टेंबर २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि विषयांचे स्पष्टीकरण हे कंपनीच्या सभासदांना त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर पाठविण्यात आले आहे. मतदानाचा अधिकार असणाऱ्या कंपनीच्या सभासदांना स्वत: ऐवजी त्यांच्या प्रतिनीधीला सदर सभेला उपस्थित राहण्यासाठी व मतदान करण्यासाठी नियुक्त करण्याचा अधिकार आहे व तो प्रतिनिधी कंपनीचा सभासद असण्याची गरज नाही. कंपनी कायदा २०१३ च्या कलम ९१ तरतुदीनुसार सभासद नोंदणी व कंपनी सभासद हस्तांतरण नोंदणी पुस्तक बुधवार दिनांक ०९ सप्टेंबर २०१५ ते बुधवार दिनांक २३ सप्टेंबर २०१५ (दोन्ही दिवस समाविष्ट) दरम्यान बंद राहील.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ आणि कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम २०१४ च्या नियम २० आणि सूचिबद्धता कराराच्या खंड ३५ब नुसार, कंपनी ही सभासदांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने २६व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये मतदान करण्याची सुविधा सी.डी.एस.एल. द्वारे प्रदान करण्यात येणाऱ्या दूरस्थ ई–मतदानाद्वारे उपलब्ध करीत आहेत. सभेला उपस्थित रहाणाऱ्या आणि दूरस्थ ई–मतदानाद्वारे आपले मतदान न केलेल्या सभासदांसाठी, कामकाज संबंधात मतदान पत्रिकेद्वारे आपले मतदान करण्याची सुद्धा व्यवस्था करण्यात आली आहे. सभेच्या आधी दूरस्थ ई–मतदानाद्वारे आपले मतदान केलेले सभासद हे सभेला उपस्थित राहू शकतील परंतु ते पुन्हा मतदान करण्यासाठी हक्कदार असणार नाहीत.

ज्या सभासदांना आपले ई–मेल पत्ते डिपॉझिटरीजकडे नोंदवले आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक स्वरुपात तसेच ज्या सभासदांनी आपले ई–मेल पत्ते नोंदवले नाहीत किंवा छापील प्रतीची मागणी केली आहे, त्यांना सदर सूचना तसेच वार्षिक अहवालाच्या प्रती दिनांक ३१ ऑगस्ट २०१५ रोजी पाठविण्यात आले आहेत. तसेच हे दस्तावेज कंपनीचे संकेतस्थळ www.sanghvicranes.com तसेच www.cdslindia.com येथे उपलब्ध आहेत.

वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठविल्यानंतर एखाद्या व्यक्तीने कंपनी चे भाग घेतले आणि डिपॉझिटरीजद्वारे बाळगण्यात येणाऱ्या लाभार्थी मालकांच्या नोंदणी वहीमध्ये ज्याचे नाव हे बुधवार १६ सप्टेंबर २०१५ रोजी असेल त्यांनाच दूरस्थ ई–मतदान किंवा सर्वसाधारण सभेमध्ये मतदानाचा हक्क असेल. दूरस्थ ई–मतदानाचा कालावधी हा शनिवार, १९ सप्टेंबर २०१५ रोजी सकाळी ०९.०० वाजता सुरु होईल आणि मंगळवार २२ सप्टेंबर २०१५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजता समाप्त होईल. २२ सप्टेंबर २०१५ रोजी संध्याकाळी ०५.०० नंतर दूरस्थ ई–मतदान प्रक्रिया बंद होईल आणि सदर तारखेच्या आणि वेळेच्या नंतर सभासदांना मतदान करण्याची अनुमती असणार नाही.

मतदान प्रक्रिया न्याय आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात असल्याचे परीक्षण करण्यासाठी श्री. विनायक खानवलकर, भागीदार, मे. कंज अँड असोसिएटस, व्यावसायिक कंपनी सचिव, यांची परिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

दूरस्थ ई–मतदानाच्या संबंधात कोणत्याही तक्रारी, प्रश्न किंवा मुद्दे असल्यास, सभासद हे वारंवार विचारले जाणारे प्रश्न आणि www.evotingindia.com मधील मदत सेवेचा संबंधात असलेल्या पुस्तिकेद्वारे नीरसन करुन घेऊ शकतील किंवा helpdesk.evoting@cdslindia.com येथे ई–मेल लिहू शकतील अथवा कंपनी सचिव यांच्याशी +९१ २०–६६७४ ४७०० येथे संपर्क साधावा.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार,
**संघवी मूव्हर्स लिमिटेड** करिता
**राजेश पां. लिखिते**
कंपनी सचिव
मे. क्र. एसीएस–१३१५१

स्थळ : पुणे
दिनांक : ३१ ऑगस्ट २०१५